**तांत्रिक मार्गदर्शक सुचना.**

जा.क्र./उसंपिसं/२०१५-१६/गा.ग.निर्मूलन/ /२०१५
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ५
दिनांक- / /२०१५

**प्रति,**

**१) विभागीय कृषि सहसंचालक, (सर्व)**

**२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (सर्व)**

**विषय:- विनाअनुदानीत तत्वावरील गाजरगवत निर्मूलन मोहीम तांत्रिक मार्गदर्शक सूचना.**

गाजरगवत या तणामुळे शेतीमध्ये व आरोग्यविषयक मोठया प्रमाणात प्रश्न निर्माण होत असल्याने त्याचे निर्मूलन करण्यासाठी विनाअनुदानीत तत्त्वावर व्यापक प्रमाणावर मोहीम राबविण्यासाठी खालीलप्रमाणे तांत्रिक मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत.

**कार्यवाहीचे नियोजन व अंमलबजावणी :-**

| अ. क्र. | करावयाची कार्यवाही | कार्यवाहीचा महिना |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्या अधिपत्याखाली जिल्हा कृती समिती गठीत करणे. | १५ जून २०१५ |
| २ | गाजरगवताखालील ग्रासीत क्षेत्र निश्चित करणे. | १५ ते २४ जुलै २०१५ |
| ३ | जिल्हयातील विविध विकास गटातील व शहर प्रभागांतील गट प्रमुखांची निश्चिती करुन स्वयंसेवी संस्था/ सेवाभावी संस्था/ राष्ट्रिय छात्र सेना/ होमगार्डस्/ सहकारी संस्था/ शाळा/ महाविद्यालये/ सामाजिक संस्था/ वनस्पती व इतर शास्त्रज्ञ/आदी सर्वांना गाजरगवत निर्मूलनासाठी प्रवृत्त करुन सहभागी करुन घेणे व त्यासाठी व्यापक स्वरुपात प्रचार व प्रसार करणे. | २६ ते ३० जुलै २०१५ |
| ४ | जिल्हयातून विविध गटामार्फत श्रमदान करुन गाजरगवताचे निर्मूलन करणे | १ ते ३१ ऑगस्ट २०१५ |

राज्यात बहुतांश जिल्हयांतील शेतीचे क्षेत्र गाजरगवताने ग्रासलेले असून त्यानुषंगाने गाजरगवताचे निर्मूलनासाठी विनाअनुदानीत तत्वावर मोहीम हाती घेण्यात यावी. त्यानुषंगाने सदर मोहीमेस निश्चित दिशा देण्यासाठी वरीलप्रमाणे कालबध्द कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी. यासाठी आपले जिल्हयाचे जिल्हाधिकारी/ मुख्य कार्यकारी अधिकारी/ गटविकास अधिकारी/ तहसिलदार/ स्वयंसेवी संस्था/ शाळा/ महाविद्यालये/सहकारी संस्था/इतर शासकीय/निमशासकीय संस्था यांचे मार्गदर्शन, सहकार्य व आवश्यक ती सर्व मदत घेण्यात यावी.

या मोहीमेस विभागीय स्तरावरुन, जिल्हास्तरावरुन, तालुकास्तरावरुन व ग्रामस्तरावरुन व्यापक प्रसिध्दी दयावी. यासाठी प्रसार माध्यमांचे व्यापक प्रमाणात सहकार्य घ्यावे. मोहीमेस चालना देण्यासाठी मेळावे, चर्चासत्र, आकाशवाणी, पोस्टर्स, घडीपत्रिका, ग्रामसभा यांचे माध्यमातून या मोहीमेचे महत्व सर्वांना पटवून देण्यात यावे.

गाजरगवत निर्मुलनाच्या या मोहीमेत आपले अधिनस्त सर्व कृषि यंत्रणेला सहभागी करावे व सदरची मोहीम पूर्णपणे यशस्वी करण्याचे दृष्टीने कार्यवाही करावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी आयुक्तालयास सादर करावा.

सदर मार्गदर्शक सुचना कृषि विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहेत. त्यानुषंगाने मार्गदर्शक सुचना सर्व क्षेत्रीय कार्यालयांपर्यंत वितरीत होतील याची कृपया दक्षता घ्यावी.

**संचालक**
**विस्तार व प्रशिक्षण**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रतिलिपीः**

१. मा.अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

२. मा. कुलगुरु, कृषि विदयापीठे, महाराष्ट्र राज्य (सर्व), यांना माहिती व योग्य त्या सहकार्यासाठी सस्नेह सादर.

**प्रतः** १. कृषि विकास अधिकारी, (जिल्हा परिषद) **सर्व**

/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली उपरोक्त मोहीम यशस्वी  करणेसाठी सर्वतोपरी सहकार्य करावे.

२. कृषि उपसंचालक (माहीती विभाग), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविण्यांत येते की गाजरगवत निर्मूलनाच्या उपरोक्त मोहीमेसाठी, घडीपत्रीका व पोस्टर्स तयार करण्याची त्वरेने कार्यवाही करावी  व त्याचे वाटप सर्व क्षेत्रीय कार्यालयांना करावे.

## गाजरगवत निर्मूलनाची विनाअनुदानीत मोहीम

महाराष्ट्र राज्यात गाजरगवत हे पांढरी फुली, चटकचांदणी, ओसाडी अशा नावाने ओळखले जाते. पावसाला सुरूवात झाल्यावर नवीन गवत वाढीला लागते. जुन्या झाडांना पालवी फुटून ती लवकर फूलावर येतात. पाने गाजराच्या पानासारखी चिरलेली असतात म्हणून याला सर्वसाधारणपणे गाजरगवत संबोधतात. या वनस्पतीचे शास्त्रोक्त नांव पार्थेनियम हिस्टेरोफोरस असे आहे.

गाजरगवताच्या झाडांना मोठया संख्येने फुले येतात आणि त्यापासून हजारो बिया निर्माण होऊन त्याचा प्रसार होतो, त्यामुळे गाजर गवताचा प्रसार झपाटयाने होतो. सदर गवताचा प्रसार शेतामधील बांध, पडीतजमीन, चराऊ कुरणे, नदी-नाले, धरणे व कालवे, रेल्वेलाईन या भागांत मोठया प्रमाणांत आढळून येतो. राज्यात अदयापही मोठया प्रमाणावरील क्षेत्र गाजरगवताने व्यापले आहे. राज्यात साधारणतः सन १९७०-७२ पासून या तणाचा झपाटयाने प्रसार झाला. गाजरगवत हे तण मुख्य पिकांशी स्पर्धा करते व शेतीच्या मातीतील पोषक द्रव्ये शोषून घेते, त्यामुळे पिकांच्या वाढीवर परिणाम होवून उत्पादनात घट येते. दुभत्या जनावरांनी गाजरगवत खाल्यास दुधाची चव बदलते व गुणवत्ताही कमी होते. गाजरगवताच्या स्पर्शाने असात्म्य (अलर्जी) होऊन त्वचाविकार अथवा श्वसनविकाराचा त्रास उद्‌भवण्याचा धोका असतो.

गाजरगवतापासून शेती, बागायती शेती, वनस्पतीचे होणारे नुकसान आणि मानवी जीवनावर होणारे दुष्परिणाम याचा विचार करता गाजरगवताचे प्रभावीपणे नियंत्रण करण्यासाठी राज्यांत दरवर्षी सामुहीकरित्या गाजरगवताचे नियंत्रणाबाबत ग्रामपंचायत, पंचायत समिती, नगरपालिका, जिल्हा परिषद स्तरावर शेतकरी/स्वयंसेवी संस्थाचे पदाधिकारी व इतर विभागांतील कर्मचा-यांना मार्गदर्शन करुन त्यांच्या मदतीने खास मोहीमा घेण्यात येतात. त्यामध्ये खालील पध्दतीचा अवलंब करुन गाजरगवताचे सामुहीकरित्या नियंत्रण करण्यात येते.

दरवर्षी प्रामुख्याने जुलै व ऑगस्ट महिन्यात गाजरगवताचे प्रभावी नियंत्रण करण्याकरिता सर्व क्षेत्रीय अधिका-यांमार्फत जनसहकार्याने खास मोहीम घ्यावी. जनजागृतीसाठी सदर मोहीमेबरोबरच आकाशवाणी, दुरदर्शन, वृत्तपत्रे, प्रसिद्धी माध्यमे, सभा, दंवडी, मासिक व पाक्षिक, चर्चासत्रे यांचेद्वारे शेतक-यांना मार्गदर्शन करण्यांत यावे.

वरील नियोजनानुसार सदर कार्यक्रमासाठी, १५ जून पर्यंत जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) यांचे अधिपत्याखालील सर्व संबधीतांचा समावेश असलेली कृती समिती गठीत करावी. माहे १५ ते २४ जुलै पर्यंत गाजरगवताचे ग्रासीत क्षेत्र सर्वेक्षणाद्वारे निश्चित करावे. २६ ते ३० जुलै पर्यंत विविध प्रसार माध्यमांव्दारे सर्व सरकारी/निमसरकारी कार्यालये, स्वयंसेवी संस्था, राष्ट्रीय छात्रसेना, शाळा, महाविद्यालये, होमगार्डस इत्यादींना गाजरगवत निर्मूलासाठी प्रवृत्त करुन, जुलै व ऑगस्ट महिन्यात प्रत्यक्ष गाजरगवत कापणे तथा गाजरगवत उपटून समूळ उच्चाटन करावे. त्यानुषंगाने जिल्हा स्तरावर समित्या स्थापण्याचे व नियोजनाची कार्यवाही करण्यात यावी.

### 1) प्रतिबंधात्मक (भौतीक) उपाययोजनाः

**यामध्ये** शेतातील तसेच रस्ते, पडीक जमिनी इत्यादी ठिकाणचे गाजरगवत फूलावर येण्यापूर्वी मुळासकट उपटून टाकून त्याचे कंपोस्ट खत तयार करणे किंवा त्याचा ढीग करुन वाळल्यानंतर जाळून टाकण्याची कार्यवाही करण्यांत यावी.

### 2) निवारणात्मक उपाययोजानाः

यामध्ये उभ्या पिकांतील गाजर गवताचे तण निंदणी, खुरपणी व कोळपणीव्दारे मुळासकट काढून टाकणे बाबत शेतक-यांना मार्गदर्शन करण्यात यावे.  तसेच पडीक जमीनी वरील गाजरगवतावर २-४ डी, ग्लायफॉसेट किंवा ॲट्रॅझीन या तणनाशकांची शिफारस केलेल्या मात्रेनुसार फवारणी करुन नियंत्रण करण्याविषयी कृषि विद्यापीठांनी व त्यानुषंगाने कृषि विभागाने केलेल्या शिफारशींबाबत मार्गदर्शन करावे. तणनाशके फवारणीसाठी आवश्यक नोझल बाबत व प्रत्यक्ष फवारणीच्या पद्धतीबाबत शास्त्रोक्त मार्गदर्शन करावे. तणनाशके फवारणी केलेला पंप स्वच्छ धुतल्याशिवाय पुन्हा वापरु नये.

**3) निर्मूलनात्मक उपाययोजनाः**

गाजरगवत हे सर्वच ठिकाणी सहजतेने वाढत असल्यामुळे त्याचे संगठीतरित्या नियंत्रण करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत, नगरपालिका, जिल्हा परिषद, ग्रामविकास खाते, महसूल खाते, सिंचन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व कृषि विभाग तसेच इतर स्थायी संस्था यांच्या मदतीने गाजरगवताचे सामुहीकरित्या नियंत्रण करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

उभ्या पिकातील गाजरगवत निंदणी, खुरपणी, कोळपणीद्वारे मुळासकट काढावे. निरनिराळया पिकात या तणाच्या नियंत्रणासाठी तणनाशकांच्या शिफारशी केलेल्या आहेत. त्यांचा अवलंब केल्यास गाजरगवत रोखता येते. पडीक जमिनीत गाजरगवतासाठी सुद्धा योग्य तणनाशकाची शिफारस केलेल्या मात्रेप्रमाणे फवारणी करावी व गरज भासल्यास दहा ते पंधरा दिवसांनी दुसरी फवारणी करावी. गाजरगवताच्या निर्मूलनासाठी पीक व तण उगवण्यापूर्वी उगवणपूर्व तणनाशकांची फवारणीकरणे लाभकारक ठरते. त्यानंतर उगवलेले गाजरगवत हाताने उपटून घेऊन एकत्रित करुन ठेवावे व ते वाळल्यानंतर जाळून टाकावे. त्याशिवाय १० टक्के मिठाचे द्रावणाची फवारणी करुनही तणनियंत्रण करता येते. मात्र, मिठामुळे जमिनीचा पोत बिघडणार नाही याची पूर्व दक्षता घेणे आवश्यक आहे.

स्टायलो हेमाटा हे गाजर गवतास स्पर्धायुक्त पिक आहे. शक्य असेल तेथे विशेषतः पडीक जमिनी, बांधाच्या सभोवती पाउस पडल्याबरोबर स्टायलो हेमाटा या गवताचे बी फेकल्यास, गाजरगवताची वाढ खुंटते व त्याच्या प्रसारास आळा बसण्यास मदत होते.

**4) जैविक नियंत्रणः**

केंद्र शासनाच्या दिनांक १७ ऑगस्ट २००० च्या पत्रानुसार प्रकल्प संचालक, जैविक नियंत्रण, (पी.डी.बी.सी.), बंगलोर यांनी संशोधीत केलेल्या झायगोग्रामा बायोकोलोराटा या मेक्सीकन भुंग्याची गाजर गवत निर्मूलनासाठी शिफारस केलेली आहे. सदरचे भुंगे पाऊस पडल्यानंतर प्रतिहेक्टरी ३ ते ४ लक्ष इतक्या संख्येने गाजरगवत ग्रासीत क्षेत्रात सोडल्यास ते गाजरगवताची पाने फस्त करुन या तणाच्या वाढीस आळा घालते.

सदर कार्यक्रमाच्या प्रगतीबाबत विभागीय कृषि सहसंचालक यांनी खालील प्रपत्रात दर महिन्याच्या ८ तारखेपर्यंत माहिती कृषि आयुक्तालयास पाठवावी.

| अ.क्र. | जिल्हा | ग्रासितक्षेत्र | प्रत्यक्ष निर्मूलन केलेले क्षेत्र | शेतकरी मेळावे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |